# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : ०२२ ६९४०३३३३ ई.मेल :collector.mumbaisuburb@maharashtra.gov.in


तक्रार क्र. १०९, ११० व २५९

क्र.: सी/कार्या-२ आय/कावि-२५८, २८७, ५२७, ५६८/एस्सेल वर्ल्ड/२३
दिनांक : 28/०१/२०२४.

प्रति,
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा
उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई, ३०२, वेक फिल्ड हाऊस, ३रा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

विषय :१) **तक्रार क्र.१०९**- Request for restoration of Culvem Lake Gorai and also action against destroyers of wetlands. **(श्री. स्टॅलिन डी.)**

२) **तक्रार क्र.११०**.-Destruction of Wetland & Creek in Gorai Essel World Area **(श्री. हरिष पांडे)**

३) **तक्रार क्र.२५९**-मौजे गोराई, ता. बोरीवली येथील एस्सेल वर्ल्ड / पॅन इंडिया या व्यावसायिक कंपनीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कटकारस्थान करून कित्येक एकर जागेतील कांदळवन नष्ट करणे, खाडीच्या प्रवाहाचे नैसर्गिक मार्ग नष्ट करणे, पाणथळ क्षेत्र नष्ट करणे, कांदळवन पाणथळ वर अवलंबून जीवसृष्टी नष्ट करून निसर्ग आणि पर्यावरणाची अतोनात हानी केल्या प्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करणे, केलेला भराव, बांध व बांधकामे काढून टाकून त्याचा खर्च तसेच पर्यावरणाची हानी केल्याची नुकसान भरपाई वसूल करणे तसेच पुन्हा खाडीच्या प्रवाहाचे नैसर्गिक मार्ग खुले करून कांदळवन लागवड करणेबाबत. **(श्री.धिरज परब)**

संदर्भः १. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई पत्र, दि.०३/०५/२०२३ सोबत श्री. स्टॅलीन डी. यांचा ई-मेल अर्ज दि.१५/०४/२०२३.

२.या कार्यालयाकडील पत्र क्र.सी/कार्या-२आय/टे-८/पाणथळ/तक्रार क्र.१०९/२०२३, दि.१८/१०/२०२३.

३. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई पत्र दि.०३/०५/२०२३ सोबत श्री.हरीष पांडे यांचा दि.१७/०४/२०२३ रोजीचा अर्ज.

४. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई पत्र क्र.जा.क्र.ल.ले./समिती/१८९/सन २०२३-२४ फोर्ट, मुंबई, दि.०९/०८/२०२३ यासोबत श्री.धीरज परब यांचे दि.०५/०६/२०२३ अर्ज.

५.मा.विभागीय कांदळवन संरक्षण व संवर्धण संनियत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त दि.१२/०९/२०२३ व दि.१८/१२/२०२३.

६. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल पत्र क्र.उविअ/मुंपउ/कार्या-५/कांदळवन/कावि-४२७/२०२३, दि.११/१०/२०२३.


उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 364
दिनांक 01/02/2024
प्रशासकीय अधिकारी उप वनसंरक्षक




CamScanner

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. १, ३ व ४ अन्वये श्री.स्टॅलिन डी. (तक्रार क्र.१०९) , श्री.हरिष पांडे (तक्रार क्र.११०) व श्री.धिरज परब (तक्रार क्र.२५९) यांच्या विषयांकीत तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भ क्र.२ च्या पत्राचे / अहवालाचे अवलोकन होणेस विनंती आहे. सदर पत्रान्वये संदर्भ क्र.१ श्री.स्टॅलिन डी. (तक्रार क्र.१०९) बाबत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करणेत आलेला आहे. (प्रत संलग्न)

तदनंतर सदर प्रकरणी मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि.३१/०८/२०२३ रोजी आयोजित केलेल्या विभागीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीचे दि.१२/०९/२०२३ रोजीचे संदर्भ क्र.४ च्या इतिवृत्ताचे अवलोकन केले असता, सदर तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करुन परिपूर्ण अहवाल पुढील पूर्वी सादर करणेकामी निर्देशित केले होते.

**त्या अनुषंगाने या कार्यालयाकडून कळविलेनुसार, सदर प्रकरणी संदर्भ क्र. ६ अन्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर दि.११/१०/२०२३ रोजीच्या पत्राने या कार्यालयास अहवाल सादर केला असून पूढीलप्रमाणे माहिती सादर करणेत येत आहे.**

प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी मौजे गोराई एस्सेल वर्ल्ड, सं. क्र. २६८, न. भू.क्र. १९१२ या शासकीय मिळकतीवर दि.२२/०८/२०२३ रोजी स्थळपहाणी आयोजित करण्यात आली होती. प्रकरणी कांदळवन कक्षाच्या अहवालानुसार, मौजे-गोराई एस्सेल वर्ल्ड सं.क्र. २६८ न.भू.क्र. १९१२ या ठिकाणी स्थळपाहणीच्या वेळी घेतलेल्या जी.पी.एस. रिडींगच्या ठिकाणी (प्रत संलग्न) MRSAC नकाशानुसार सन २००५ साली कांदळवन आहे. परंतु सदयस्थितीत सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच मातीचा व रॅबीट (सिमेंट काँक्रीट), भराव केलेला आहे. तसेच पत्रे व सिमेंट पाईप लावून पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बंद केलेले आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी सदर केलेल्या अहवालात तक्रारीत नमुद केलेनुसार सदरचे क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. परंतु सदरचे क्षेत्र कांदळवनापासून ५० मीटरच्या आत येत आहे. नमूद जी. पी. एस. रिडींग घेतलेल्या ठिकाणी MRSAC नकाशानुसार सन २००५ साली कांदळवन आहे. परंतु सद्य:स्थितीत सदर ठिकाणी कांदळवन नाही.

सदर ठिकाणी स्थळपाहणी केली असता, कच्च्या रस्त्यावर सिमेंट काँक्रिट (Raw Material, रॅबीट) टाकलेले आहे. तसेच त्याला लागून डाव्या बाजूस बांबूची रोपे लागवड केलेली आहे. तसेच त्याच्या पुढे कांदळवनाला लागून लाकडांच्या फळीचे कुंपण केलेले आहे व काही ठिकाणी कांदळवनालगत पत्रे व सिमेंटचे पाईप लावून पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बंद केलेले आहे. तसेच त्यापुढे अंदाजे १७५ मीटर x २०० मीटरचे पाण्याचे तळे प्लॅस्टिक पेपर टाकून साचविलेले आहे. व त्यापुढे जुने दोन पाण्याचे तळे असून, त्याला लागून पुढे कांदळवनापर्यंत मातीचा भराव टाकलेला आहे असे कांदळवन कक्षाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

प्रकरणी तक्रारदार, श्री. हरिष पांडे व स्टॅलिन डी. यांचे तक्रारीचे अनुषंगाने विषयांकीत मिळकतीची दि.११/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता १) सहाय्यक कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग, २) तहसीलदार बोरीवली, ३) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई, ४) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी आयोजित करणेत आलेली होती.

सदर स्थळपाहणीस मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, वनपरिमंडळ अधिकारी, वनरक्षक गोराई, परिरक्षण भूमापक क्र. ४, मंडळ अधिकारी, कुरार, तलाठी साझा गोराई, गोराई पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी व तक्रारदार, श्री. हरीष पांडे व स्टॅलिन डी चे प्रतिनिधी, श्री. नंदकुमार पवार व श्री. पवन पाटील तसेच पॅन इंडीया पर्यटनचे प्रतिनिधी, श्री. चिंतक पटेल हे उपस्थित होते.



CS CamScanner

सदर स्थळपाहणी दरम्यान मोजे-गोराई, ता. बोरीवली येथील स.नं. २६८, न.भू.क्र. १९१२ येथील मिळकतीची पाहणी प्रथम वर्डपार्क समोर असलेल्या गेटमधून करण्यात आली. तेथे मातीचा भराव करून कच्चा रस्ता तयार केल्याचा दिसून आला. त्यावर सिमेंट कॉंक्रेट (रॉ मटेरीयल) व रॅबीट माती टाकलेली दिसून आली. त्याच्या डाव्या बाजूस लागून बांबूची रोपे लागवड केल्याचे दिसून आहे. तसेच त्याला पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन केल्याचे दिसून आले. व सदर ठिबक सिंचना करीता काळा पाईप विविध ठिकाणी वापरण्यात आलेला असून, त्याच्या पुढील कांदळवनालगत माती टाकून कच्चा रस्ता केल्याचे दिसून आले.

तसेच पश्चिमेकडील बाजूस पाणी जाण्यासाठी लहान चर केल्याचे दिसून आले. तेथे भराव करून तयार करण्यात आलेल्या रस्त्याची रूंदी अंदाजे ६ मीटर असल्याचे दिसून आले. तसेच कांदळवनालगत लाकूड वापरून कुंपण केल्याचे दिसून आले. व तेथे कंपाऊंडच्या दक्षिणेकडील बाजूस मोकळी जागा असून, तेथे गवत उगवल्याचे दिसून आले. तसेच मोकळ्या जागेच्या दक्षिणेकडील बाजूस पाणी साचलेले असून, त्यामध्ये ब-याच प्रमाणात झाडांचा पालापाचोळा टाकल्याचेही दिसून आले.

तसेच काही ठिकाणी कांदळवनालगत पत्रा व सिमेंटचा पाईप लावून नैसर्गिक पाण्याचा प्रवाह बंद केल्याचेही दिसून आले. व त्याच्या पुढील भागात पाण्याचा तलाव अंदाजे ८० x ९० मीटर असून त्याच्या बांधाची उंची ५ मीटर व ३ मीटर रूंदी इतकी असून, त्यामध्ये गोड्या पाण्याचा साठा आहे. तसेच त्याच्या पुढील भागात दुसरा तलाव असल्याचेही दिसून आले. त्याची लांबी, रूंदी अंदाजे १७५ x २०० मीटर इतकी असल्याचे दिसून आले. व त्याच्या बांधाची रूंदी अंदाजे ५ मीटर व खोली अंदाजे ७ मीटर इतकी असल्याचे दिसून आले. त्यावर काळ्या रंगाची ताडपत्री (प्लॅस्टिक) टाकले असून, त्यामध्ये गोडे पाणी साठविल्याचे दिसते. व त्याच्या पुढे अंदाजे ५० मीटर अंतरावर पाण्याचे दोन तळे असल्याचेही दिसून आले. सदर तळ्याच्या लगत बांबूची रोपे लागवड केल्याचे दिसून आले व वरील दोन तलावाच्यामध्ये विखुरलेल्या स्वरूपात माती टाकल्याची दिसून आले. सदर मिळकत खाजगी असून त्याच्या उत्तर व पूर्व दिशेस खाजगी मालकीचे कांदळवन असल्याचे दिसून येत आहे. तसेच दक्षिणेस खाजगी मिळकत व पश्चिमेस एस्सेल वर्ल्ड पॅगोडाकडे जाण्याचा मार्ग आहे.

प्रकरणी पॅन इंडिया पर्यटन प्रा. लि.यांनी तहसीलदार बोरीवली यांचेकडे म्हणणे सादर केले होते. त्याची प्रत या कार्यालयास दि. ३०/०८/२०२३ रोजी सादर केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी पुढील प्रमाणे मुद्दे नमूद केले आहेत.

i) मौजे-गोराई, ता. बोरीवली येथील स.नं. २६८, न.भू.क्र. १९१२ ही मिळकत खाजगी असून, ७/१२ धारक सदरी पॅन इंडीया इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि. व पॅन इंडीया पर्यटन प्रा. लि. यांचे नांव आहे. एस्सेल वर्ल्डच्या मनोरंजन पार्कच्या योजनांना MCGM द्वारे १९८८-८९ मध्ये मंजूर करण्यात आली होती. त्यात विकासकाने पाणी पुरवठ्यासाठी स्वतःची व्यवस्था करावी, पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जलशुद्धीकरण संयंत्र, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, वृक्षारोपण हे लक्षात घेऊन, झाडे लागवड आणि पुनर्रोपण यासह शेतीचा उद्देश आणि पावसाचे पाणी साठवण्यासाठी जमीन विकसित केले असून अशा प्रकारे, १९८९ पासून या जमिनीचा एकत्रितपणे रोपवाटिका आणि पावसाचे पाणी साठवण्यासाठी वापर केला जात आहे. मौजे गोराई, एस्सेल वर्ल्ड, सर्व्हे क्र. २६८ मधील जमिनी मूळतः श्री.शामराव बेलकर यांना १८८५ मध्ये शेतीसाठी देण्यात आल्या होत्या. या जमिनी लागवडी योग्य करण्यासाठी मूळ मालकाने १८८५ मध्ये या जमिनीवर साडेतीन मैल लांबीचा बंधारा बांधला आहे. बंधाऱ्याचे अस्तित्व मुंबई उच्च न्यायालयाने १८९९ च्या अपील क्रमांक १०० (२५ बोम ३२ = २ बी. एल. आर. ४९९) आणि आयुक्त, एन.डी. यांनी जारी केलेले पत्र. L.N.D. 603 दिनांक २४ नोव्हेंबर १९१९, मुंबई सरकार, महसूल विभाग आदेश क्रमांक ६१३, बॉम्बे कॅसल २४ फेब्रुवारी १९२० ०२/०४/१९०० च्या आदेशाच्या प्रतीत नमूद केले आहे.

ii) महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९ च्या कलम २ (जी) मधील तरतुदींनुसार खार जमीन कशाला म्हणतात त्याची व्याख्या दिलेली आहे.

*"khar land" means such tidal land as is made cultivable or otherwise beneficial in any manner whatsoever by protecting it, by means of an embankment, from the sea or tidal*



CS CamScanner

*river, and includes all such land in whatever manner described, whether as khar, khajan, kharepat, gazni or otherwise;"*

iii) MoEF CRZ अधिसूचने दिनांक १८ जानेवारी २०१९ G.S.R. नुसार खाजगी जमिनींवर कोणताही मॅन्ग्रोव्ह बफर झोन नाही. ३७(E) पृष्ठ क्रमांक ४४ वर परिशिष्ट-१ वर उल्लेखित सामान्य उपाय @ क्र. १.१ मॅन्ग्रोव्ह: (ii) (ब). खाजगी जमिनींसाठी मॅन्ग्रोव्ह बफर नसल्याचा उल्लेख केला आहे. आणि समांतर राज्य वनविभाग खाजगी जमिनींसाठी नो मॅन्ग्रोव्ह बफर झोनची दाखल घेण्यात यावी आणि मॅन्ग्रोव्ह सेलने उच्च न्यायालयाला याची माहिती द्यावी.

iv) भूमापन क्रमांक २६८ मधील हे बंधारे खूप जुने आहेत काही ठिकाणी जीर्ण झाले आहेत आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी त्यांनी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून (एमएमबी) दिनांक ०१/०९/१९९७ अनुलग्नक-डी तसेच बंधा-याच्या दुरुस्तीच्या संदर्भात परवानग्या घेतल्या आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) द्वारे ०९/०३/१९९९ परिशिष्ट ई च्या पत्राद्वारे प्रमाणित केले गेले आहे की, बंधारा दुरुस्तीची क्रिया CRZ अधिसूचना १९९१ नुसार अनुज्ञेय आहे, MPCB **(Maharashtra Pollution Control Board)** ने देखील या कार्यालयाकडे यांना शिफारस केली आहे.

v) गोराई गावातील सर्व्हे क्र. २६८, २६९ मधील मातीच्या बांधात पावसाचे पाणी साठवण्यासाठी जिल्हाधिकारी, गोराई मच्छिमार सहकारी संस्था लिमिटेड (GMSSL) आणि बॉम्बे एन्व्हायर्न्मेंटल ॲक्शन ग्रुप (BEAG) यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आणि दावा केला की हा उपक्रम सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन आहे आणि मा. हायकोर्टाने दिनांक २०/०१/२००० च्या आपल्या आदेशाद्वारे याचिका फेटाळून लावली आणि राज्य कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला निर्देश दिले आणि दिनांक १९/०३/२००४ चे आदेश दिले. त्यानुसार, मुंबईच्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, MCZMA ने आदेश क्रमांक MCZMA/64 दिनांक 29/05/2004 पारित केला कोणतेही CRZ उल्लंघन, आणि एस्सेलच्या जमिनींचे सीआरझेड पुनर्वर्गीकरणाच्या पुनरावलोकनास परवानगी दिले आहे. MCZMA द्वारे नियुक्त केलेल्या समितीच्या संयुक्त साइट भेटीनंतर, त्यांच्या दिनांक २६/१२/२००३ च्या संयुक्त भेट अहवालात असा निष्कर्ष काढला की बंधारा १९.०२.१९९१ पूर्वी अस्तित्वात होता.

vi) पॅन इंडिया प्रयत्न प्रा.ली. कंपनीने रोपवाटीका, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी (एम.सी.झेड.एम.ए.) च्या निर्देशानुसार लावलेले मॅन्ग्रोव्ह पार्क विकसित करण्यासाठी दिनांक २९/०५/२००४ च्या आदेशानुसार लावलेली आहेत. आणि सन २००४ पासून नियोजित क्षेत्रात रोपवाटीका प्रक्रिया चालू आहे. कंपनीने लावलेली ही रोपवाटीका रोपे गूगल प्रतिमांत व MRSAC मॅप मध्ये टिपली गेली आहेत. एन.आय.ओ.आणि एम.सी.झेड.एम.ए.यांच्या सल्ल्यानुसार ती लावली गेलेली आहेत आणि त्यास मान्यता देखील मिळाली आहे आणि ती मुंबई मॅनग्रोव्ह सेलच्या निरीक्षणाखाली आहे.मुंबई मॅन्ग्रोव्ह सेल संवर्धन युनिटने खारफुटीच्या रोपांच्या पुनर्रोपण योजनेस दिनांक १५/०६/२०१६ रोजी मान्यता दिली आहे.

vii) सर्वे क्र. २६८ चा विकास करण्याबाबत एस्सेल वर्ल्ड यांनी घेतलेल्या परवानग्या / ना हरकत प्रमाणपत्रे.

अ ) सर्वे क्र. २६८ वर एस्सेल वर्ल्ड बृहन्मुंबई महानगर पालिकेने दिलेल्या निर्देशांनुसार पर्जन्य जलसंवर्धन योजा राबवित आहे सदर पर्जन्य जलसंवर्धन योजनेला दि. १८/१२/२०१४ आणि दि.२५/०१/२०१६ रोजी मंजूरी देण्यात आली आहे.

ब) अपर जिल्हाधिकारी, मुं.उ.जि.यांनी पर्जन्य जलसंवर्धन योजने करीता दि.२५/०५/२०१५, ०७/०५/२०१६, १३/०१/२०२१, २४/०४/२०२३ व ०५/०६/२०२३ रोजी परवानग्या दिलेल्या आहेत.

क) एमसीझेडएमए यांच्या दि. ३१ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या ९८ व्या बैठकीत (मुद्दा क्र. ८) मध्ये सदर विस्तारीत पर्जन्य जलसंवर्धन प्रस्ताव विचारात घेण्यात येऊन सदर प्रस्तावावर सीआरझेड मुद्द्यांच्या दृष्टीने निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले आहे.

ड) एसईआयएए यांच्या दि. २७-२९ जुलै, २०१५ रोजी भरवण्यात आलेल्या ८६ व्या बैठकीत पर्यावरण मंजुरी देण्यात आलेली आहे.एसईआयएए चे दि.१४ डिसेंबर, २०१५ चे पत्रानुसार पर्यावरण मंजुरी देण्यात आलेली आहे.

इ)मुंबई कांदळवन संवर्धन विभागाने सदर कागदपत्रे व जागेच्या स्थितीची तपासणी करून दि. २५/०६/२०१६ रोजी कांदळवनाची छोटी झुडुपे पुनर्रोपित करण्याच्या योजनेला मंजूरी दिलेली आहे.

फ) एमपीसीबी द्वारे स्थापन केलेल्या संमतीची मंजूरी मिळालेली आहे सदर संमती आदेश क्र. Format १०/BO/RO-HQ/१६०१२८FT०२१६/CE/CC-१६०७०००३५, दि.२१/०७/२०१६ असा आहे.

प्रकरणी यापुर्वी सन २०१३-२०१४ मध्ये न्यु लिंक रोड रेसीडट्स – फोरम दहिसर यांनी मे. पॅन इंडिया पर्यटन प्रा.लि.यांनी त्यांचे मालकीच्या खाजगी कांदळवनाच्या नुकसानीचीबाबत मा.मुंबई उच्च न्यायालय येथे जनहीत याचिका क्र. ८७/२०१३ मध्ये ही बाब निर्देशणास आणली होती. त्याअनुषंगाने चौकशी होवून या कार्यालकडील पत्र, दि.१२/०३/२०१९ नुसार शासनास अहवाल सादर करण्यात आला होता. या संदर्भात मा.मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) यांनी दि. १७/०४/२०२३ च्या पत्रान्वये शासकीय अभियोक्ता यांचे अभिमत तसेच विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रस्तुत प्रकरणी नव्याने गुन्हा नोंद करणे न्यायोचित ठरणार नसल्याने प्रस्तुत प्रकरण शासन स्तरावर बंद करण्यात येत असल्याचे या कार्यालयास कळविले आहे, असे नमूद केले आहे.

तसेच मौजे-गोराई, ता. बोरीवली येथील सर्व्हे क्र. २६८ मध्ये पाणथळ क्षेत्र अधिसुचित झाल्याची अधिसुचना अद्याप प्राप्त नाही. अशा परिस्थितीत पाणथळ क्षेत्राचे नुकसानीबाबत काय कार्यवाही करता येईल ? या संदर्भात MCZMA यांचेकडून मार्गदर्शन मागवावे, उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे अहवालामध्ये असे मत नमूद केले आहे.

प्रकरणी CRZ अधिसूचना दि.१८ जानेवारी २०१९ मध्ये CRZ 1A (i) मध्ये पुढील प्रमाणे नमूद आहे.

"Mangrove (in case mangrove area is more than 1000 Sq.metres, a buffer of 50 meter along with the mangroves shall be provide and such area shall be also constitute CRZ-1A)"

सदर अधिसूचनेमधील Annexure-1 मध्ये "Enviroment management plan" तयार करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सदर Annexure-1 च्या मुद्दा क्र. १.१ मधील उपमुद्दा ii(b) मध्ये "Mangroves in private land will not require a buffer zone" असे नमूद केले आहे. त्यामुळे खाजगी कांदळवनास ५० मीटर बफर झोन लागु आहे अगर कसे? असे नमूद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पॅन इंडिया पर्यटन प्रा. लि.यांनी घेतलेल्या परवानग्या, मा.मुख्य वन संरक्षक (मंत्रालय) यांचेकडील दि. १७/०४/२०२३ चे पत्र, सीआरझेड अधिसूचना १८ जानेवरी २०१९ नुसार खाजगी कांदळवनास ५० मीटर बफर झोन संदर्भातील तरतुदी, पाणथळ क्षेत्राबाबतची नियमावली, तक्रारदार यांचा तक्रार अर्ज व पॅन इंडोया पर्यटन प्रा. लि यांनी सादर केलेले म्हणणे यांचा एकत्रीतपणे विचार करून निर्णय घेण्यासाठी सर्व संबंधितांची जिल्हास्तरावर बैठक घेवून व गरज भासल्यास शासन स्तरावरून मार्गदर्शन मागवून पुढील आदेश होणेबाबत उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी विनंती केली आहे.

त्या अनुषंगाने सदर प्रकरणी या कार्यालयात दि.०६/१२/२०२३ रोजी सर्व संबधितांची बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर बैठकीत विषयांकीत तक्रारीं व पॅन इंडिया प्रा.लि. यांनी सादर केलेले म्हणणे याअनुषंगाने चर्चा करणेत आली. तदनंतर विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना अहवाल सादर करणेकामी निर्देशित केले होते. (बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत संलग्न)

तदनंतर सदर प्रकरणी वन विभागामार्फत दि.२८/१२/२०२३ रोजी स्थळपाहणी आयोजित केली असल्याचे या कार्यालयास अवगत केले होते. परंतू, सदर प्रकरणी अद्याप पर्यंत वन विभागाने या कार्यालयास अहवाल सादर केलेला नाही.

प्रकरणी या कार्यालयाकडील अभिलेखाचे अवलोकन केले असता, MoEF (Ministry of Environment and Forest Department) यांनी मुंबई उपनगर जिल्ह्यात एकूण ८१ पाणथळ ठिकाणांचे वेटलँड कोड ब्रिफ डॉक्युमेंट तयार करून सदर माहिती आज्ञावलीमध्ये अपलोड करणेकामी कळविण्यात आले होते. त्यानुसार बोरीवली तालुक्यात MoEF ने दर्शविलेल्या एकूण पाणथळ ठिकाणांपैकी १५ पाणथळ ठिकाणे असून सदर ठिकाणांपैकी एकही पाणथळ ठिकाण वेटलँड म्हणून घोषित करता येण्यासारखे नसलेबाबत तहसीलदार बोरीवली यांनी या कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता, उपरोक्त **नमूद तक्रारीमधील मिळकतीचा MoEF ने दर्शविलेल्या ठिकाणांमध्ये समावेश होत नाही.**

उपरोक्तप्रमाणे आपले माहिती व पूढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(सतिश बागल)
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची सही असे.**

**प्रत** — विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचे कार्यालय, ब-६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पू), मुंबई-४०००२४ यांचेकडे माहिती व पूढील कार्यवाहीसाठी रवाना.

२/- सदर प्रकरणी या कार्यालयात दि.०६/१२/२०२३ रोजी सर्व संबधितांची बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर बैठकीत विषयांकीत तक्रारी व पॅन इंडिया प्रा.लि. यांनी सादर केलेले म्हणणे याअनुषंगाने चर्चा करणेत आली. त्याअनूषंगाने आपणांस अहवाल सादर करणेकामी निर्देशित केले होते. मात्र, सदर प्रकरणी अद्याप आपण या कार्यालयास अहवाल सादर केलेला नाही. सबब, सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सदस्य सचिव,कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांना परस्पर सादर करून माहितीसाठी अहवालाची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.